वर्ष-०९ अंक-३३ मुंबई, मंगळवार ०४ ते १० जुलै - २०२३ पृष्ठ-४
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
मूल्य २/- रुपये
POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र
# POLICE BATMI PATRA

●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2 अतिसंवेदनशील त्वचेचा आजार

3 → एकीकडे प्रवाशांचा होरपळून मृत्यू तर दुसरीकडे अचानक शपथविधी हे कसे काय?

ठाणे प्रवासासाठी चार ते पाच तास नोकरदारांची हजेरी अर्धवेळ, महिलांचे सर्वाधिक हाल ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

## अवघ्या 26 मिनिटांत मुंबई पोलिसांनी लावला बेपत्ता मुलाचा शोध; आईने मानले आभार



**मुंबई पोलिसांच्या या कृतीचे सर्वच स्तरातून कौतुक केले जात आहे. मुंबई पोलिसांनी अवघ्या 26 मिनिटांमध्ये बेपत्ता झालेल्या मुलाचा शोध लावून त्याला आईच्या स्वाधीन केले आहे.**

मुंबई पोलिसांनीएका तीन वर्षीय बेपत्ता मुलाचा अवघ्या 26 मिनिटांच्या आत शोध घेतला आहे. मावशीने दिलेल्या तक्रारीनंतर वडाळा पोलिसांनी काही मिनिटांमध्येच बेपत्ता मुलाचा शोध घेऊन त्याला कुटुंबियांकडे सोपवले आहे. मुंबई पोलिसांच्या या कामगिरीचे सर्व च स्तरातून कौतुक होत आहे. मुंबईतील (Mumbai News) वडाळा पोलिसांनी हरवलेल्या मुलाची माहिती मिळाल्यानंतर अवघ्या 26 मिनिटांत हरवलेली 3 वर्षीय मुलगा सापडला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना 2 जुलै रोजी घडली, जेव्हा मुलीच्या मावशीने वडाळा पोलिस ठाण्यात ती बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली. मुलगी सोबत असताना अचानक बेपत्ता झाल्याचे मावशीने पोलिसांना सांगितले होते. तक्रारीची गंभीर दखल घेत, बेपत्ता मुलाचा शोध घेण्यासाठी सर्व बीट मार्शल आणि गस्त घालणाऱ्या वाहनांना याबाबत कळवण्यात आले. तक्रार प्राप्त होताच वडाळा पोलिसांचे निरीक्षक आदित्य साष्टे यांनी बेपत्ता मुलाचा शोध घेण्यासाठी तातडीने सर्व उपलब्ध माहिती गोळा केली. वडाळा पोलिसांच्या हद्दीतील पोलिसांचे सर्व बीट मार्शल ...पान २ वर...




## अजित पवार म्हणाले- पक्ष आमचा, चिन्ह आमचा, बहुसंख्य आमदारही आमचेच; साहेबांनी आशीर्वाद द्यावा -प्रफुल्ल पटेल



शपथ घेतलेल्या राष्ट्रवादीच्या 9 आमदारांना पहिला मोठा झटका बसला आहे. शपथ घेतलेल्या 9 आमदारांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी ही कारवाई केली आहे. यानंतर आता अजित पवार गट देखील आक्रमक झाल्याचे दिसत आहे. जयंत पाटील यांची राष्ट्रवादीच्या ...पान २ वर...

## धक्कादायक ! चॉकलेटच्या आडून गर्भपाताच्या गोळ्यांची वाहतूक; पोलीस आणि एफडीएची कारवाई



धाराशिव जिल्ह्यात एक धक्कादायक प्रकार समोर आला असून, चक्क चॉकलेटच्या आडून गर्भ पाताच्या गोळ्यांची वाहतूक करणाऱ्यावर पोलिसांसह औषध प्रशासनाने कारवाई केली आहे. उत्तेजना वाढवणारी औषधी व गर्भ पाताच्या गोळ्यांची वाहनातून अवैधपणे वाहतूक सुरु असल्याची माहिती मिळाल्याने औषध प्रशासन व परंडा पोलिसांनी सापळा लावून शुक्रवारी ही कारवाई केली आहे. यावेळी वाहनात चॉकलेट, गोळया, तसेच मच्छर मारण्याचे लिक्विडही आढळून आले. विशेष म्हणजे संबंधित व्यक्तीकडे औषधविक्रीचा ...पान २ वर...

## पुण्यात कोयत्याची दहशत कायम; कॉलेजच्या बॅगमध्ये पुस्तकाऐवजी आणला कोयता, अद्दल घडवण्यासाठी पोलिसांनी कॉलेजमध्ये काढली धिंड

पुणे : कोयता शेतीचं अवजार म्हणून वापरला जायचा तो कोयता आता दहशत निर्मा णकरण्यासाठी वापरला जातोय. कधी गाड्यांची तोडफोड करण्यासाठी, कधी दोन गटातील राड्यासाठी तर कधी एकतर्फी प्रेमासाठी कोयता उगारला जातोय. पुण्यातील (Pune News) सदाशिव पेठेत तरुणीवर झालेल्या हल्ल्याची घटना ताजी असतानाच आता एका



तरुणाने थेट कॉलेजमध्येच कोयता काढला. पोलिसांनी तात्काळ घटनेची गांभीर्या नेदखल घेत तरुणाला अटक केली आहे. एवढच नाही तर अशा घटनांना चाप बसावा आणि तरूणाला अद्दल घडवण्यासाठी आरोपीची कॉलेजमध्ये चक्क धिंड काढली आहे कुणाल कानगुडे (19 वर्षे) असे या आरोपी तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या ...पान २ वर...

## ठाणे महापालिकेतील ८८० पद भरतीचा मार्ग मोकळा



ठाणे: वाढत्या लोकसंख्येमुळे ठाणे महापालिका अधिकारी आणि कर्म चाऱ्यंवरील वाढलेला ताण कमी करण्यासाठी आकृतीबंधला मंजुरी देण्यापाठोपाठ राज्य शासनाने आता आकृतीबंधमधील पद भरतीच्या नियमावलीस मंजुरी दिली आहे. यासंबंधीचा अध्यादेश राज्य शासनाने काढला असून यामुळे ठाणे महापालिकेतील ८८० वाढीव पद भरतीचा मार्ग मोकळा झाला आहे. ठाणे महापालिकेची स्थापना १९८२ मध्ये झाली असून ही 'ब' वर्ग महापालिका आहे. सद्य:स्थितीत महापालिकेचे ९ प्रभाग असून, पालिकेचे एकूण क्षेत्रफळ १४७ चौ. कि. मी. एवढे आहे. २०११ ..पान २ वर...

## इस्लामिक स्टेटशी संबंध असल्याचा संशय; 'एनआयए'ची मुंबई, पुणे येथे 5 ठिकाणी छापेमारी

नवी दिल्ली: पुण्यातील एका ठिकाणी आणि मुंबईतील चार ठिकाणी अजूनही शोध सुरू आहे. सूत्रांनी 'एएनआय'ला सांगितले की, छापे टाकण्यात आलेल्या ठिकाणी इस्लामिक स्टेटशी निष्ठा असलेल्या संशयितांच्या ठिकाणांचा समावेश आहे. भारतविरुद्ध युद्ध पुकारल्याचा संशय: दहशतवाद विरोधी पथकाने या वर्षा च्या सुरुवातीला गुन्हा दाखल केला आणि




दहशतवादी आणि हिंसाचाराच्या घटना घडवून आणण्यासाठी आणि भारताविरुद्ध युद्ध पुकारण्याच्या इस्लामिक स्टेट (ISIS) योजनेचा एक भाग म्हणून दहशतवादी कट रचणाऱ्या संशयितांविरुद्ध चौकशी सुरू केली. अशी माहिती सूत्रांनी दिली.नऊ जणांविरुद्ध आरोपपत्र : सूत्रांनी सांगितले की, “भारतातील आयएस विचारसरणीच्या ...पान २ वर...

## दोन रिक्षा चोरल्या अन् कबुलीही दिली; कारण वाचून पोलिसांनीही मारला कपाळावर हात

नवी मुंबईतील पावणे गावात एक अजब प्रकार समोर आला आहे. काही दिवसांपूर्वी गावातून दोन रिक्षा चोरीला गेल्या होत्या. पोलिसांनी शोध घेत चोरट्याला ताब्यात घेतलं. मात्र, त्याची चौकशी केल्यानंतर चोरीचे कारण ऐकताच पोलिसही चक्रावले आहेत. शमीम बशीर शेख, असं आरोपीचे नाव आहे. आरोपी शमीम बशीर शेख हा ...पान २ वर...



## दोघांत तिसरी... गर्लफ्रेंडसाठी पतीनं पत्नीचं नाक कापलं; खिशात ठेवलं अन् फरार झाला




गर्ल फ्रेंडसाठी अगदी चंद्र, तारे आणणारे, एवढंच नाहीतर जीव देणारेही आपण पाहिले आहेत. पण एका प्रेमवेड्यानं गर्ल फ्रेंडसाठी आपल्या पत्नीचं नाक कापलं आहे. बरं पत्नीचं कापलेलं नाक हा पठ्ठ्या खिशात ठेवून फरार झाला. पत्नीनं पतीची पोलिसांत तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. तसेच, पोलिसांनी फरार पतीला अटक केली आहे. एका वृत्तसंस्थेनं दिलेल्या माहितीनुसार, ...पान २ वर...


## कल्याण-डोंबिवलीत बेकायदा बांधकामे, नियंत्रणासाठी ७७ कर्मचा-यांची नियुक्ती

कल्याण- कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील वाढत्या बेकायदा बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पालिका आयुक्तांनी १० प्रभाग हद्दीत १० क्षेत्रिय (बीट) निरीक्षक आणि ६७ क्षेत्रिय मुकादम नेमण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला. मागील अनेक वर्षा पासूनची क्षेत्रिय कर्म चारी ही मोडीत काढलेली प्रशासकीय पध्दत आयुक्तांनी पुन्हा सुरू केल्याने प्रभागात सुरू असलेल्या बेकायदा बांधकामांना आळा बसणे शक्य होणार आहे.यापूर्वी पालिकेत प्रत्येक प्रभागात क्षेत्रिय कर्म चारीहोते. प्रभागात सुरू असलेली बेकायदा बांधकामे, चोरीच्या नळजोडण्या यांची माहिती क्षेत्रिय




कर्म चाऱ्यंकडून साहाय्यक आयुक्तांना दैनंदिन मिळत होती. असे गैरप्रकार तात्काळ रोखणे पालिका अधिकाऱ्यांना सहज शक्य होते. मागील आठ वर्षा पासून प्रभागातील क्षेत्रिय कर्म चारी (बीट कर्म चारी) ही संकल्पनाच मोडीत काढण्यात आली. या कर्म चाऱ्यंना फेरीवाला हटाव पथक, देयक वाटप करणे अशा अनेक कामांना जुंपण्यात आले. प्रभागात सुरू असलेल्या गैरप्रकारांची माहिती पालिका अधिकाऱ्यांना मिळणे अवघड झाले होते. शासनाने २००६, २००९ मध्ये पालिका हद्दीत होणाऱ्या बेकायदा बांधकामांवर कारवाई करण्याची जबाबदारी पालिका अधिकाऱ्यांवर निश्चित केली आहे. या आदेशाची अंमलबजावणी पालिकेकडून केली जात नव्हती. आयुक्त डाॅ. भाऊसाहेब दांगडे यांनी मागील शासकीय आदेशांची कठोर अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. पालिका हद्दीत दोन लाखाहून अधिक बेकायदा बांधकामे झाली आहेत. दरवर्षी लहान मोठी आठ हजाराहून बेकायदा बांधकामे होत आहेत. अशाप्रकारे बांधकामे होत राहिली तर शहराचे नियोजन ढेपाळून पडेल. ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आल्याने आता उपअभियंते, कनिष्ठ अभियंते आणि क्षेत्रिय कर्म चारी यांच्यावर प्रभागातील बेकायदा बांधकामे नियंत्रणाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. अ प्रभागात कनिष्ठ अभियंता ओंकार भोईर, ब प्रभागात अधीक्षक भूषण कोकणे, क प्रभागात कनिष्ठ अभियंता संजय आचवले, जे, ड प्रभागात पर्यवेक्षक बिस्तुर मस्कर, फ, ग प्रभाग कनिष्ठ अभियंता राहुल म्हात्रे, ह प्रभागात कनिष्ठ अभियंता सुनील म्हादलेकर, आय प्रभाग कनिष्ठ अभियंता डी. एस. गोरे, २७ गाव ई प्रभाग वरिष्ठ लिपिक गोविंद हंडोरे, वरिष्ठ लिपिक वैभव सरनोबत यांची क्षेत्रिय निरीक्षक म्हणून नियुक्ती ...पान २ वर...

## पलावामध्ये वाहन उभे करण्यावरून वकील आणि त्यांच्या आईला बेदम मारहाण



डोंबिवली: कल्याण शीळ रस्त्यावरील पलावा वसाहती मधील व्हीएनतो इमारतीमध्ये रविवारी वाहन उभे करण्यावरून वकील आणि त्याच्या आईला तीन जणांनी बेदम मारहाण केली. मानपाडा पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल करण्यात आली आहे. शरद मनारी असे मारहाण झालेल्या वकिलाचे नाव आहे. सागर पाटील, अरविंद पाटील आणि अन्य एक अनोळखी इसम अशी आरोपींची नावं आहेत. पोलिसांनी सांगितले, वकील शरद मनारी राहत असलेल्या इमारतीच्या तळमजल्याला त्यांनी आपले वाहन उभे केले होते. त्या वाहनाच्या पाठीमागे आरोपी सागर पाटील यांनी वाहन उभे केले होते. त्यामुळे शरद यांना वाहन बाहेर काढताना अडचण निर्मा णझाली होती. वकील शरद यांनी आरोपी सागर यांना वाहन असे उभे का केले आहे अशी विचारणा केली. त्याचा राग सागर यांना आला. त्यांनी शरद यांना ठशाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच सागर ...पान २ वर...

# अतिसंवेदनशील त्वचेचा आजार

"डॉक्टर बघाना, आमचा अर्णव आता दोन वर्षाचा आहे. पण तो सहा महिन्याचा असल्यापासून त्याला अंगावर सतत पुरळ उठणं आणि खाज येणं असं चालूच आहे. औषध पाणी केलं की, जरा बरं वाटतं, पण परत ये रे माझ्या मागल्या. त्याला अ‍ॅलोपॅथी करून झालं. होमिओपॅथी केलं, आयुर्वेदिकही केलं. पण कश्शाने गुण म्हणून येत नाही. काय करावं कळत नाही." अर्णवच्या आईच्या जीवाची होणारी घालमेल मला कळत होती.

हा आजार होण्याची शक्यता कोणाला जास्त असते? त्वचारोगाच्या बाह्यरुग्ण विभागात तपासणीसाठी आलेल्यांपैकी साधारण ३ ते ५ टक्के रुग्ण हे या आजाराचे असतात. अतिलहान मुलांमध्ये हा आजार जास्त प्रमाणात दिसतो. पण शाळकरी मुलं आणि मोठ्या माणसांनादेखील हा आजार होऊ शकतो. ज्यांच्या जवळच्या नातेवाईकांना (उदा. आई-बाबा, आजी-आजोबा, काका, मामा, मावशी, आत्या) दमा, वारंवार शिंका, अंगावर पित्त उठणे, डोळ्यांना खाज येणे किंवा अटोपिक डर्मेटायटिस वगैरे आजार असतात, त्यांनाही हा आजार होण्याची शक्यता जास्त असते. ज्यांना लहानपणी बालदमा असतो त्यांना मोठेपणी हा त्वचारोग होऊ शकतो. या उलटही ज्यांना लहानपणी टोपिक डर्मेटायटिस असतो त्यांना मोठेपणी दमा किंवा सर्दी शिंकांचा आजार होण्याची शक्यता जरा जास्त असते.

**आजाराची कारणे**

अनुवंशिकता हे त्याचे एक महत्त्वाचे कारण आहे. अतिउष्ण व अतिदमट हवा किंवा अतिथंड व अतिकोरडी हवा, लोकरीचे, नायलॉनचे किंवा जास्त खरखरीत व घट्ट कपडे, साबण, डिटर्जंट, सॅनिटायझर यांचा वापर, तसेच धूळ व धुळीमध्ये असणारे सूक्ष्मजंतू (डस्ट माईट) यांच्या संपर्कामुळे हा आजार होण्याची शक्यता जास्त असते. आपले घर जर काही दिवस बंद असेल तर गादी व चादरीवरदेखील हे धुळीतील जंतू बेसुमार वाढतात व ज्यांची त्वचा संवेदनशील आहे त्याला अशा गादीवर झोपल्यामुळे अंगाला खाज येऊ शकते. कुत्रा मांजरांच्या अंगावरील केस तसेच त्यांच्या अंगावरील धुळीमुळेदेखील काही जणांना अंगाला खाज येऊ शकते.

**आजाराची लक्षणे**

वयोमानाप्रमाणे या आजाराची लक्षणे वेगवेगळी असू शकतात. पण त्वचा कोरडी असणे आणि अतिसंवेदनशील असणे हे या आजाराचे सर्वसामान्य लक्षण आहे.

**लहान बालके**

साधारण वयाच्या दोन ते तीन महिन्याकडे हा आजार सुरू होतो. या वयातील मुलांच्या गालावरील त्वचा कोरडी होते व तेथे लाल पुरळ येते. तसेच कपाळ, हातापायांची बाहेरील त्वचा व कधी कधी पोटापाठींवर व डोक्यात देखील लाल पुरळ येऊन कधी कधी त्यातून लस येते. एवढ्या छोट्या मुलाला नेमके कुठे खाजवावे ते कळत नाही. पण ही मुलं बऱ्याच वेळा कान खाजवतात व थोडी मोठी झाली की मग आजार झालेली त्वचा खाजवत राहतात. खाजेमुळे त्यांची झोपही अपुरी होते व ती चिरचिरी होतात. पुढे रांगायला लागली की ही मुलं कधीकधी अडगळीत जातात व तिथल्या धुळीमुळे त्यांचा हा आजार



थोडा वाढू शकतो. साधारण दोन वर्षानंतर हा आजार बऱ्यापैकी आटोक्यात येतो. या वयातील ज्या बालकांना मच्छर चावलेले सहन होत नाहीत, त्यांनाही अटोपिक डर्मेटायटिस किंवा बालदमा किंवा ॲलर्जीची सर्दी असण्याची किंवा होण्याची शक्यता जास्त असते.

**शाळकरी मुलेमुली**

या वयोगटात हा आजार अंगभर न राहता हातापायाच्या लवणींमध्ये तर कधी काखेमध्ये किंवा जांघेमध्ये किंवा मानेवर अशा ठराविक ठिकाणी राहतो. या ठिकाणी बारीक पुरळ उठून भरपूर खाज येते. या वयात मुलांचे मैदानात व मातीमध्ये खेळणे जास्त असते. तसेच खेळल्यामुळे काखेत व जांघेत घामही येतो. त्यामुळे हा आजार कमी अधिक प्रमाणात सुरू राहातो. जसा बालदमा सहावी- सातवीपर्यंत राहतो, तसाच हा शाळकरी मुलांचा अटोपिक डर्मेटायटिस जशी मुलं मोठी होतात तसा कमी होत जातो.

**स्त्री पुरुष**

मोठ्या व्यक्तींच्या मानेवर किंवा हातावर किंवा जास्त करून पायांवर जे जाड कोरडे काळपट रंगाचे जुनाट इसब असतात तेही या आजारामुळे असू शकतात. काही व्यक्तींना गणपती दिवाळीला घर झाडले की अंगावर धुरळा किंवा जळमटे बसल्यामुळे उघड्या भागावरील त्वचेला भरपूर खाज येऊन पुरळ उठते. तसेच काही जणांना गवत कापलं, शेतातला पेंढा हाताळला, किंवा बरेच दिवस कपाटात ठेवलेला स्वेटर किंवा एखादा ड्रेस घातला की अंगाला खाज येते.

हेही अटोपिक डर्मेटायटिसचे लक्षण असते. काही व्यक्तींना विशेषतः स्त्रियांना हाताला मिरची, मसाला, कांदा, लिंबाचा रस, वेगवेगळ्या भाज्या, कपड्या - भांड्यांचा साबण, डिटर्जंट, फिनेल इत्यादींचा संपर्क झाल्यास हात कोरडे पडतात. त्यांना चिरा पडतात व ते लाल होऊन भरपूर खाज येते. याला हाताचा इसब (Hand Eczema किंवा Housewife Eczema) म्हणतात व तेही अटोपिक डर्मेटायटिसचे लक्षण असते. अटोपिक डर्मेटायटिस असलेल्या रुग्णाची त्वचा पिकण्याची व जडावण्याची शक्यताही जरा जास्त असते व त्यामुळे जिथे आधीच खाजरे पुरळ आहे तिथे पिकलेल्या फोडी येणे व लस किंवा पू वाहणे असेही कधी कधी होऊ शकते.

**घरगुती उपाय व काळजी**

या आजारात त्वचा कोरडी असते. त्यामुळे हा आजार असलेल्या तान्ह्या मुलांना दोनदा टब मध्ये कोमट पाण्यात बसवणे हे फार महत्वाचे आहे. तसेच मोठ्यांनी देखील त्यांचे हातपाय पाच मिनिटे पाण्यात बुडवावे. त्यानंतर हलक्या हाताने टिपून लगेच मॉइश्चरायझर लावावे. दिवसातून तीन-चार वेळा मॉइश्चरायझर लावावे. आंघोळीला सौम्य साबण, उदाहरणार्थ पिअर्स , डव्ह किंवा SYNDET बार वापरावा. आंघोळीला कोमट पाणी वापरावे. धूळ, धूर, केमिकल्स, गवत, पेंढा, झाडे, झुडपे, रेती, माती, सिमेंट यापासून लांब रहावे. घराची साफसफाई करावी लागणार असेल तर संपूर्ण अंग कपड्याने झाकून घ्यावे. हातात रबरी हातमोजे घालावेत. चेहऱ्यावर कपडा बांधावा.

जे शक्य आहे ते ओल्या फडक्याने पुसावे. चादरी व उशीचे अभ्रे वारंवार धुऊन गरम पाण्यातून काढावीत. काही दिवस घर बंद असल्यास रुग्णाव्यतिरिक्त कोणीतरी गादी काठीने बडवून तिच्यावर इस्त्री मारावी जेणेकरून तिथले धुळीतील जंतू मरतील. वुलन, नायलॉन व अतिखरखरीत कपडे टाळावेत. अंगावर घाम राहिल्यास त्यामुळेही अशा व्यक्तींना खाज येते. त्यामुळे हवा दमट व उष्ण असल्यास शक्यतो पंख्याखाली किंवा एअर कंडिशनमध्ये राहावे, तसेच घाम आल्यास लगेच नरम कपड्याने पुसावा. ज्यांना हाताला हा आजार आहे त्यांनी हॅण्डवॉश किंवा सॅनिटायझर टाळावे व अशा व्यक्तींनी स्वयंपाक करताना डॉक्टर वापरतात तसे लॅटेक्सचे हातमोजे वापरावेत. भांडी घासावी लागल्यास कोपरापर्यंत रबरी मोजे वापरावेत.

**डॉक्टरी उपचार**

त्वचारोगतज्ज्ञ या आजारासाठी मॉइश्चरायझर तसेच आजाराचे स्वरूप पाहून कमी अधिक तीव्रतेची स्टिरॉइडची मलमे लिहून देतात. ही स्टिरॉइडची मलमे डॉक्टरांच्या सल्ल्यानेच व त्यांनी सांगितलेल्या कालावधीसाठीच वापरणे आवश्यक आहेत, कारण त्यांचेही दुष्परिणाम असतात. तसेच खाज कमी करण्यासाठी डॉक्टर अँटी-हिस्टॅमिनिक्स गोळ्या देतात. तसेच खाजेमुळे जंतूंचा संसर्ग होऊन खट / फोडी झाली असल्यास डॉक्टर अँटिबायोटिक लिहून देतात.

आजाराचे स्वरूप जास्त असल्यास व अंगभर आजार असल्यास डॉक्टर्स तोंडावाटे घेण्यासाठी स्टिरॉइडस तसेच प्रतिकारशक्तीवर प्रभाव टाकणारी काही औषधे ( उदा. Azathioprine, Cyclosporine इ.) लिहून देतात. समाजात जेवढी जागरूकता दमा किंवा ॲलर्जीच्या सर्दीबद्दल आहे तेवढी या अटोपिक डर्मेटायटिस किंवा अतीसंवेदनशील त्वचेच्या आजाराबद्दल नाही. त्या आजारांप्रमाणेच हा आजारही समाजातील बऱ्यापैकी लोकांना होतो. योग्य ती काळजी घेतल्यास हा आजार बऱ्यापैकी नियंत्रणात राहू शकतो.

## दोघांत तिसरी... गर्लफ्रेंडसाठी पतीनं पत्नीचं

बांसताली गावात राहणाऱ्या विक्रमचं लग्न काही वर्षांपूर्वी मोहम्मदाबाद गावात राहणाऱ्या सीमा देवीशी झालं होतं. लग्नानंतर दोघांना दोन गोंडस मुलंही झाली. पण याचदरम्यान विक्रमचं गावातील दुसऱ्या एका महिलेवर जीव जडला आणि तिथूनच सुरू झाला प्रेमाचा त्रिकोण. काही दिवस विक्रमचं प्रेम प्रकरण सुरू होतं, पण याची कुणकुण एक दिवस विक्रमची पत्नी सीमादेवीला लागली. तिनं याचा विरोध करण्यास सुरुवात केली. तेव्हापासून विक्रम आणि सीमा देवी यांच्यात सातत्यानं खटके उडत होते. नेमकं घडलं काय? पीडित पत्नीनं पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री जवळपास 8 च्या दरम्यान विक्रमनं सर्वा त आधी जेवण बनवायला सांगितलं. तेव्हाच पती-पत्नीमध्ये वादाला सुरुवात झाली. तेवढ्यात विक्रमला राग अनावर झाला आणि त्यानं आपल्या लहान मुलीवर राग काढण्यास सुरुवात केली. सीमा देवीनं विक्रमला थांबवण्याचा प्रयत्न केला आणि आपल्या लहान मुलीला विक्रमच्या तावडीतून सोडवण्याचा प्रयत्न केला. तेवढ्यात संतापलेल्या विक्रमनं एका धारधार हत्यारानं सीमा देवीचं नाकच कापलं. सीमादेवी रक्तबंबाळ झाली. विक्रमनं कापलेलं नाक खिशात ठेवलं आणि तो तिथून फरार झाला. रक्तबंबाळ झालेली सीमा देवीनं त्याच परिस्थितीत पोलीस ठाणं गाठलं आणि पतीच्या विरोधात तक्रार दाखल केली. पोलिसांनी तात्काळ या प्रकरणाची दखल घेत गुन्हा दाखल केला. पीडित पत्नी सीमा देवी यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी पती विक्रमविरुद्ध गुन्हा दाखल केला. यानंतर पोलिसांनी सीमा देवी यांना उपचारासाठ जिल्हा रुग्णालयात दाखल केलं. सध्या सीमा देवीवर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली. काही वेळातच पोलिसांनी आरोपीला अटक करुन कोर्टा तहजर केलं. त्यानंतर आरोपीची रवानगी कोठडीत झाली. या प्रकरणाबाबत लखीमपूरचे सीओ सिटी संदीप सिंह यांनी सांगितलं की, मितौली पोलीस स्टेशन हद्दीतील बांस्तली गावात पतीनं पत्नीवर हल्ला केला आणि तिचं नाक कापलं. गुन्हा दाखल केल्यानंतर पतीला अटक करून कारागृहात पाठवण्यात आलं असून या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

## दोन रिक्षा चोरल्या अन् कबुलीही दिली;

सांताक्रुज येथे राहतो. तर, ज्यांची रिक्षा चोरी झाली ते वामन मुकादम पावणे गावात राहतात. 17 जून रोजी नेहमीप्रमाणे त्यांनी घराबाहेर त्यांची रिक्षा पार्क केली होती. मात्र, दुसऱ्यादिवशी सकाळी ते कामासाठी घराबाहेर निघाले तेव्हा घराबाहेर रिक्षा नसल्याचे त्यांच्या लक्षात आले. घराच्या आजूबाजूच्या परिसरात व गावात शोधाशोध केली. मात्र रिक्षा कुठेच सापडली नाही. रिक्षा न सापडल्याने मुकादम यांनी तुर्भे एमआयडीसी पोलिस ठाण्यात रिक्षा चोरी प्रकरणी तक्रार दिली. तक्रारीनुसार पोलिसांनी आरोपीचा शोध घेण्यास सुरुवात केली. तसंच, अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा नोंद केला होचा. रिक्षाचा तपास करत असताना पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि अन्य पर्या यांचा वापर करत शोध घेण्याचे ठरवले. सीसीटीव्ही फुटेज तपासत असताना पोलिसांनी आरोपीची ओळख स्पष्ट झाली. त्यानंतर वरिष्ठ पोलिस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांना चोराविषयी माहिती मिळताच त्यांनी सांताक्रुझ येथे जाऊन त्याचा शोध घेतला. पोलिसांच्या प्रयत्नांना यश आले त्यांनी तातडीने त्याला अटक केले आहे. तसंच, चोराकडे दोन रिक्षादेखील सापडल्या. पोलिसांनी या दोन्ही रिक्षा जप्त केल्या आहेत. माझ्या दोन रिक्षा सापडल्या नाहीत म्हणून मी सुद्धा दोन रिक्षा चोरी केल्या, असा कबुलीजबाब यावेळी त्याने पोलिसांना दिला होता. लॉकडाऊनच्या काळात शमीम यांच्या दोन रिक्षा चोरी झाल्या होत्या. तेव्हापासून त्यांची आर्थिक स्थिती खालावली होती. काही दिवसांपूर्वी ते तुर्भे एमआयडीसी परिसरात फिरत असताना पावणे येथे एक रिक्षा त्याच्या नजरेत आली. त्यानंतर त्यावर लक्ष ठेवत त्याने ती रिक्षा चोरी केली, असं चोरट्याने म्हटलं आहे. दरम्यान, रिक्षा चोरी केल्यानंतर त्याने पाच दिवस ती घराच्याच परिसरात पार्क केली होती. मात्र, पाच दिवस उलटूनही कोणी रिक्षा नेण्यासाठी आले नाही ते पाहून त्याने रिक्षाचा वापर करण्यास सुरुवात केली. त्यामुळं त्याचा व्यवसाय होऊ लागला. याच पद्धतीने त्याने दुसरीही रिक्षा चोरी केली होती. आरोपी शमीम शेख यांच्याकडे एक चावी होती त्याच चावीने त्याने पन्नासपेक्षा अधिक रिक्षा सुरु करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र त्याला यश आले नाही अखेर योगायोगाने पावणे गावातील मुकादम यांच्या रिक्षाला ती चावी लागली आणि तो रिक्षा चोरी करुन घेऊन गेला. मात्र चोराचा कबुलीजबाब एकून पोलिसही चक्रावले आहेत.

# हळद, मेथी, लिंबू, लसूण.. पावसाळ्यात का खायला हवेत हे पदार्थ? तज्ज्ञांनी सांगितले महत्त्व

पावसाळ्याचा गारवा जसा मनाला सुखावतो तसाच ऋतूबदलाने आजारांचा धोकाही वाढतो. आपली रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करण्यासाठी आणि आजारांपासून दूर राहण्यासाठी या काळात निरोगी आहार महत्त्वपूर्ण असतो. या पावसाळ्यात तुम्हाला शरीर रोगमुक्त ठेवण्यास मदत करू शकणारे विशिष्ट पदार्थ व सेवनाची पद्धत अपोलो हॉस्पिटल्सच्या मुख्य पोषणतज्ज्ञ डॉ. प्रियंका रोहतगी यांच्याकडून जाणून घेणार आहोत. लिंबूवर्गीय फळे `मोसंबी, लिंबू आणि द्राक्षे यांसारख्या लिंबूवर्गीय फळांमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. शिवाय हे एक शक्तिशाली अँटिऑक्सिडेंट आहे जे रोगप्रतिकारक शक्ती वाढवू शकते. व्हिटॅमिन सी संसर्गाशी लढण्यास मदत करते आणि पांढऱ्या रक्त पेशींचे उत्पादन वाढवते, जे रोगप्रतिकारक संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण आहे. या फळांचे नियमित सेवन केल्यास सर्दी, फ्लू आणि व्हायरल इन्फेक्शन यांसारख्या पावसाळ्यातील सामान्य आजारांपासून संरक्षण मिळू शकते.



सर्वात महत्त्वाचे म्हणजे व्हिटॅमिन सी तुमच्या शरीराला लोह शोषून घेण्यास मदत करते आणि हाडांच्या आरोग्यासाठी आवश्यक असते. हिरव्या पालेभाज्या जसे की पालक, मेथी यामध्ये आवश्यक जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटिऑक्सिडंट्स असतात. या भाज्या फोलेट आणि लोहाचे उत्तम स्रोत आहेत, जे निरोगी रोगप्रतिकारक शक्ती राखण्यासाठी आवश्यक आहेत. या भाज्या डिटॉक्सिफिकेशन आणि पचन सुधारण्यास देखील मदत करतात, गॅस्ट्रोइंटेस्टाइनल इन्फेक्शनचा धोका कमी करतात. आपल्या आहारात विविध प्रकारच्या पालेभाज्यांचा समावेश केल्याने पावसाळ्यात वाढणाऱ्या आजारांपासून संरक्षण मिळू शकते. दरम्यान, पावसाळ्यात पालेभाज्या अळया व दूषित पाण्यामुळे रोगांचा धोका वाढवू शकतात त्यामुळे सेवन करण्यापूर्वी त्या पूर्णपणे धुवून वाफवून घ्या. लसूण लसणात प्रतिजैविक आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवणारे ॲलिसिन नावाचे एक संयुग असते. लसणाचे नियमित सेवन केल्याने पावसाळ्यात होणाऱ्या सामान्य सर्दी आणि खोकल्यासह श्वसनाच्या संसर्गास प्रतिबंध करता येतो. आपल्या आहारात लसूण वापरू शकताच पण फायदे वाढवण्यासाठी लसणाचे कच्चे सेवन करा. हळद व मसाले हळद हा एक सोन्यासारखा मसाला आहे

## अवघ्या 26 मिनिटांत मुंबई पोलिसांनी

आणि वडाळा पूर्वेकडील चिंधी गली परिसरात व वडाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आसपासच्या परिसरात हरवलेल्या मुलाचा शोध घेण्यासाठी मोबाईल वाहने तैनात करण्यात आली होती, अशी माहिती पोलिसांनी दिली. तपासादरम्यान, बीट क्रमांक 1 वर नियुक्त मार्शल राजकिरण उत्तम बिलासकर यांना वडाळा येथील रेहमानिया मशिदीजवळ उभा असलेली मुलगा दिसली. बिलासकर यांनी मुलाजवळ जाऊन त्याला आपल्या ताब्यात घेतले आणि तो सुरक्षित असल्याची खात्री केली, असे पोलिसांनी सांगितले. एका अधिकाऱ्याने सांगितले की, अहवाल देण्यापासून ते हरवलेल्या मुलाचा यशस्वी शोध घेण्यापर्यंतच्या संपूर्ण ऑपरेशनला केवळ 26 मिनिटे लागली. बेपत्ता मुलाचा वेळेवर शोध घेण्याच्या प्रयत्नांसाठी आदित्य साष्टे आणि बीट मार्शल्सच्या तत्पर कारवाईचे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी कौतुक केले आहे. "हरवलेला मुलाला सुरक्षितपणे त्याच्या आईच्या ताब्यात देण्यात आले आहे. मुलाच्या आईने पोलिसांच्या तत्पर कारवाईबद्दल आणि मुलाला लवकरात लवकर शोधून दिल्याबद्दल त्यांचे मनापासून आभार मानले, असेही पोलिसांनी सांगितले. पोलिसांचा या कारवाईचे नेतृत्व वरिष्ठ पोलिस निरीक्षक मिलिंद जाधव यांनी केले. त्यांनी पोलिस उपनिरीक्षक आदित्य साष्टे आणि राजकिरण उत्तम बिलासकर यांच्या कार्या चे कौतुक केले. हरवलेल्या मुलाचा शोध घेण्यात त्यांचे समर्पण हे समाजाची सुरक्षा आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी मुंबई पोलिसांच्या वचनबद्धतेचे उदाहरण आहे, असेही पोलिसांनी सांगितले.

## पुण्यात कोयत्याची दहशत कायम

माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी कुणालचे आबासाहेब गरवारे महाविद्यालयात डॅनी या तरुणाशी काही वाद झाले होते. त्यानंतर कॉलेजमध्ये दहशत राहावी तसेच काही भांडणाच्या कारणामुळे त्याने थेट कॉलेजमध्ये कोयता काढून दहशत माजवली. पोलिसांना या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ कॉलेजमधील सीसीटीव्ही तपासून त्याला अटक करून डेक्कन परिसरातून त्याची धिंड काढली. अल्पवयीन मुलांमध्ये देखील गुन्हेगारी प्रवृत्ती दरम्यान पुणे शहरात गुन्हेगारी फोफावत असताना आता अल्पवयीन मुलांमध्ये देखील गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत असल्याचे चित्र आहे. शहरात दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत असल्याने याचा प्रभाव थेट विद्यार्थ्यांवर होताना दिसून येत आहे. किरकोळ कारणातून विद्यार्थी देखील भान विसरून अनुचित प्रकार घडवत आहेत. त्यामुळे पालकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. या अगोदर बऱ्याचदा शहरात महाविद्यालयीन तरुणांमध्ये हाणामारी झाल्याचं पाहायला मिळाला आहे. पुण्यात कोयता, कुऱ्हाड घेऊन दहशत माजवण्याचा पॅटर्न गेल्या काही महिन्यांपासून पुण्यातील अनेक परिसरात रोज एक भाई आणि त्यांच्या टोळ्या तयार होताना दिसतायत. वय अवघे 18- 25 , अंगावर एखादा टी शर्ट टाकायचा, फाटलेली पँट घालायची, खिशात रुमाल, तोंडावर मास्क आणि हातात कोयता अशी ओळख या नवीन भाई लोकांची तयार झाली आहे. त्यामुळे पुण्यात नव्या भाईगिरीचा उदय झाला आहे असं म्हणलं तर वावगं ठरणार नाही. पुण्यातली भाईगिरी काही नवीन नाही पण कोयता, कुऱ्हाड घेऊन दहशत माजवण्याचा पॅटर्न सध्या अनेक महिन्यांपासून शहरातील मध्यवर्ती भागात पाहायला मिळतोय. गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अशा टोळक्यांना ठोकून काढणार असे सांगितले आहे त्यामुळे आता तरी अशा गुन्हेगारांना खाकी पोलिसांचा वचक बसतो का हे पाहणं महत्त्वाचे ठरणार आहे.

## धक्कादायक ! चॉकलेटच्या आडून

परवाना व बिले आढळून न आल्याने त्याच्याविरुद्ध परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आकाश ढोबळे (रा. बार्शी) असे आरोपीचे नाव आहे. गेल्या काही दिवसांपासून सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यात अवैधरित्या गर्भ पात व उत्तेजना वाढवणाऱ्या गोळयांची अवैध विक्रीचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे अशा लोकांच्या विरोधात प्रशासनाकडून कारवाई करण्यात येत आहे. दरम्यान परंडा शहरात एका वाहनातून अवैधरित्या गर्भ पात व उत्तेजना वाढवणाऱ्या गोळयांचा पुरवठा केला जात असल्याची माहिती औषध प्रशासनास मिळाली होती. या माहितीच्या आधारे औषध प्रशासनाचे पथक वाहनाचा शोध घेत होते. तर शुक्रवारी बार्शी तालुक्यातील एक व्यक्ती वाहनातून गोळया औषधे घेऊन परंडा शहरात फिरत असल्याची माहिती औषध प्रशासनास मिळाली. या माहितीच्या आधारे औषध प्रशासनाचे औषध निरीक्षक श्रीकांत पाटील यांनी परंडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अमोल भुजबळ आणि इतर पोलिसांच्या मदतीने परंडा बसस्थानक परिसरात सापळा लावला. लाखो रुपयांच्या उत्तेजना वाढवणाऱ्या गोळया पोलीस आणि औषध प्रशासनाचे पथक सापळा लावून बसले असतानाच यावेळी एक कार औषध घेऊन जाताना पोलिसांना दिसून आली. त्यामुळे पोलिसांनी वाहनास तात्काळ थांबवून झडती घेतली. यावेळी कारमध्ये बार्शी तालुक्यातील आकाश ढोबळे याच्याजवळ लाखो रुपयांच्या उत्तेजना वाढवणाऱ्या गोळया, गर्भ पाताच्या गोळया आढळून आल्या. शिवाय, त्याच्याकडे औषध विक्रीचा परवाना व औषधांची बिलेही आढळून आली नाहीत. त्यामुळे पोलिसांनी त्यास ताब्यात घेऊन त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सहज मिळतात गोळया तरुणांमध्ये उत्तेजना वाढवणाऱ्या गोळयाचे सेवन करण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे याची मागणी लक्षात घेता धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यात अवैधरित्या उत्तेजना वाढवणाऱ्या गोळयाची विक्री सुरु असल्याचे पाहायला मिळत आहे. सोबतच गर्भ पाताच्या गोळया देखील सहज उपलब्ध होत आहे. अनेक मेडिकल चालक याची अवैधरीत्या विक्री करत असल्याची चर्चा आहे. त्यामुळे अशा लोकांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## कल्याण-डोंबिवलीत बेकायदा

करण्यात आली आहे. या अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ६७ क्षेत्रिय कर्म चारी कार्यरत असतील. क्षेत्रिय कर्म चाऱ्याने प्रभागात बेकायदा बांधकाम सुरू असल्याची माहिती दिली की कनिष्ठ अभियंता त्या जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन अहवाल उपअभियंत्याला देईल. क्षेत्रिय निरीक्षक उपअभियंता त्या बांधकामाची शहानिशा करुन त्यासंबंधी अहवाल प्रभाग अधीक्षक, साहाय्यक आयुक्तांना देईल. हे पदनिर्देशित अधिकारी विहित प्रक्रिया पार पाडून संबंधित भूमाफिया आवश्यक नोटिसा बजावतील. भूमाफियाकडून योग्य ती कागदपत्रे पालिकेत दाखल केली नाहीतर पोलीस बंदोबस्त घेऊन साहाय्यक आयुक्त संबंधित बांधकाम जमीनदोस्त करतील, अशी कार्यपध्दती या नवीन रचनेत आहे. येत्या काळात बेकायदा बांधकामांना अंकुश लागण्याची शक्यता आहे. पालिका हद्दीत आता बेसुमार बेकायदा बांधकामे सुरू आहेत. पालिकेचे आरक्षित भूखंड हडप करण्याची मोहीम माफियांनी सुरू केली आहे. एका लोकप्रतिनिधीच्या गटातील त्रिकुट या बेकायदा बांधकामांना दौलतजादा करुन अभय देत असल्याची जोरदार चर्चा शहरात आहे.

## इस्लामिक स्टेटशी संबंध

समर्थकांकडून पसरवलेल्या या प्रकरणातील संपूर्ण कट उघड करण्यासाठी 'एनआयए'चा तपास सुरू आहे." कर्ना टकातील शिवमोग्गा जिल्ह्यातील ISIS कट प्रकरणात NIA ने नऊ जणांविरुद्ध पहिले पुरवणी आरोपपत्र दाखल केल्यानंतर दोन दिवसांनी हे पाऊल पुढे आले आहे. या प्रकरणात, आरोपींनी शिवमोग्गा येथे आयईडी स्फोटाची चाचणी केली होती. तसेच इस्लामिक स्टेटच्या कटाचा एक भाग म्हणून, लोकांमध्ये दहशत आणि भीती पसरवण्यासाठी अनेक ठिकाणी जाळपोळ करून मालमत्ता आणि वाहनांची जाळपोळ केली होती. भारतातील दहशतवादी आणि हिंसाचाराच्या घटना आणि भारताविरुद्ध युद्ध पुकारण्याचे कटकारस्थान सुरूच असल्याची माहिती उजेडात आली आहे.दहशतवादी काश्मीरी जोडप्यास अटक : या वर्षी मार्चमध्ये, 'एनआयए'ने इस्लामिक स्टेट- खोरासान प्रांत (ISKP) प्रकरणात सिवनी (मध्य प्रदेश) येथे चार आणि पुण्यातील एका ठिकाणी शोध घेतला. दिल्लीतील ओखला, जामिया येथून काश्मिरी जोडपे जहांजैब सामी वानी आणि त्याची पत्नी हिना बशीर बेग यांना अटक केल्यानंतर दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने सुरुवातीला हा गुन्हा दाखल केला होता, अशी माहिती तपास यंत्रणेने दिली.

## पलावामध्ये वाहन उभे करण्यावरून

यांचा भाऊ अरविंद, आणि अन्य एका इसमाने शरद यांना मारहाण केली. आम्ही गाववाले आहोत. आम्ही तुम्हाला सोडणार नाही, अशी धमकी दिली. हा वाद सुरू असताना शरद यांची आई मध्यस्थी करण्यासाठी आली. त्यावेळी आरोपींनी त्यांना जमिनीवर पाडून त्यांनाही मारहाण केली. आईला मारहाण होत असताना शरद पुढे धावले त्यावेळी त्यांना अडवून आरोपींनी पुन्हा मारहाण केली. शरद यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी सागर आणि त्याच्या भावाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## अजित पवार म्हणाले-

प्रदेशाध्यक्ष पदावरुन गच्छंती करत सुनील तटकरे यांची राष्ट्रवादीचे नविन प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. जाहीर पत्रकार परिषदेत प्रफुल्ल पटेल यांनी सुनील तटकरे यांच्या नियुक्तीची घोषणा केली आहे. आम्हीच राष्ट्रवादी, पक्ष आणि चिन्ह आमचाच असा दावा अजित पवार यांनी केला आहे. जयंत पाटील यांना मीच प्रदेशाध्यक्ष केले होते राष्ट्रवादीचे संघटनात्मक धोरण प्रफुल्ल पटेल यांनी जाहीर केले. संघटनात्मक दृष्टीने नियुक्त्या करण्यास सुरुवात करण्यात आल्याचे प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले. पक्षाच्या 21 जूनच्या कार्यक्रमामध्ये पक्षाने अधिकृत रीतीने राष्ट्रीय कार्यकारीणी अध्यक्षाची जबाबदारी दिली होती. सप्टेंबर 2022 मध्ये पक्षाच्या अधिवेशनमध्ये पक्षाच्या संघटनात्मक नियुक्ती मी जाहीर केल्या होत्या. यावेशळी जयंत पाटील यांच्यावर राष्ट्रवादी पक्षाच्या महाराष्ट्रा प्रदेशाध्यक्षाची जबाबदारी दिली होती असे प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले. नेमकं काय म्हणाले अजित पवार? अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर दावा केलाय. राष्ट्रवादी काँग्रेस आमचीच, पक्ष आणि चिन्ह आमच्याबरोबर आहे असं म्हणत अजित पवारांनी थेट शरद पवारांना आव्हान दिले. पक्ष आमचा, चिन्ह आमचा, बहुसंख्य आमदारही आमचे आहेत. यामुळे आता साहेबांनी आशीर्वा द देऊन टाकावा असं अजित पवार म्हणाले. शरद पवारांचे आदेश लागू नाहीत असं पटेलांनी सांगितलंय. आम्ही बहुमतानं निर्णय घेतल्याचं पटेल म्हणालेत. राष्ट्रवादी सत्तेत आलेय. ही एक प्रकारची गुरुदक्षिणा असल्याचे देखील ते म्हणाले. जयंत पाटील यांची प्रदेशाध्यक्ष पदातून मुक्तता जयंत पाटील यांची प्रदेशाध्यक्ष पदातून मुक्तता करण्यात येत आहे. जयंत पाटील यांना अधिकृतरित्या याबबात कळवलण्यात आले आहे. सुनील तटकरे यांची राष्ट्रवादीचे नविन प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षातील सर्व संघटनात्मक पदांच्या नियुक्त्या या सुनील तटकरे मार्फत केल्या जातील. नियुक्त्यांबाबतचे सर्व अधिकार त्यांना देण्यात आल्याचे प्रफुल्ल पटेल यांनी स्पष्ट केले. युवक प्रदेशाध्यक्षपदी सुरज चव्हाण तर महिला प्रदेशाध्यक्षपदी रूपाली चाकणकर यांची निवड करण्यात आली आहे.

## ठाणे महापालिकेतील ८८० पद भरतीचा

जनगणनेनुसार ठाणे महापालिकेची लोकसंख्या १८ लाख ४१ हजार इतकी आहे. गेल्या १२ वर्षा तपालिकेच्या लोकसंख्येत मोठी वाढ झाली असून ही लोकसंख्या आता २४ लाखांच्या पुढे गेली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत मात्र ठाणे महापालिकेत वाढीव पदांना मंजुरी मिळाली नव्हती. यामुळे ठाणे महापालिका अधिकारी आणि कर्म चाऱ्यांवर कामाचा ताण वाढला होता. तो कमी करण्यासाठी ठाणे महापालिकेने ८८० वाढीव पदांचा आकृतीबंध तयार केला होता. त्यास राज्याच्या नगरविकास विभागाने गेल्यावर्षी मंजुरी दिली होती. वाढीव पदांच्या आकृतीबंधला मंजुरी मिळाली असली तरी त्यातील पदांच्या भरतीची नियमावली ठरलेली नव्हती. यामुळे ठाणे महापालिकेत गेले वर्षभर वाढीव पदांची भरती होऊ शकली नव्हती. दरम्यान, या पदांच्या भरती नियमावलीस राज्य शासनाने मंजुरी दिली असून त्याचा अध्यादेश काढला आहे. यामध्ये सेवा प्रवेश आणि सेवांचे वर्गीकरण करण्यात आले आहे. महापालिकेच्या कोट्यातून आणि राज्य शासनाच्या कोट्यातून कोणती किती पदे भरायची, त्याचे नियम आणि निकष ठरवून देण्यात आले आहेत. ठाणे महापालिकेत शिक्षण मंडळासह ९०८८ तर परिवहन सेवेत दोन हजार सहाशे कर्म चारी आहेत. तसेच सुमारे अडीच हजार कंत्राटी कामगार आहेत. राज्य शासनाने आकृतीबंधमधील पद भरतीच्या नियमावलीस मंजुरी दिली असून यामुळे ८८० वाढीव पदे भरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, अशी माहिती पालिका सुत्रांनी दिली.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई



मुंबई, मंगळवार ०४ ते १० जुलै - २०२३

संपादकीय...



# स्वप्नांची राखरांगोळी

'समृध्दी महामार्गा'वर शनिवारी पहाटेपूर्वी झालेल्या भीषण अपघाताने सर्वांची मने सुन्न झाली. कुणी पहिल्या नोकरीवर रुजू होण्यासाठी जात असताना भावी आयुष्याची सुस्वप्न बघत होते, कुणी आवडत्या महाविद्यालयात प्रवेश मिळाला म्हणून शिकण्यासाठी जात होते.

एक कुटुंब त्यांचा मुलगा योग्य करियरच्या मार्गावर लागल्याचे समाधान घेऊन घरी परतत होते. एक आई मुलीला भेटण्यासाठी जात होती. अशी कितीतरी स्वप्ने घेऊन विदर्भ ट्रॅव्हल्स कंपनीची बस पुण्याकडे निघाली होती.

नागपूरहून सुरू झालेला हा प्रवास वर्धा, यवतमाळ, कारंजा करीत बुलडाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजाजवळच्या पिंपळखुटा येथे कायमचा संपला अन् या खासगी बसमध्ये बसलेल्या सर्वांच्या स्वप्नांचा कोळसा झाला.

'विदर्भ ट्रॅव्हल्स'च्या अपघातानंतर तातडीने यंत्रणा हलल्या. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री घटनास्थळी पोहोचले. यातून घटना घडल्यानंतरच्या संवेदनशीलतेचे दर्शन घडले; परंतु, मूळ प्रश्न दुर्लक्षून चालणारा नाही.

'महाराष्ट्राची भाग्यरेषा' असा गौरव मिरविणारा आणि राज्याची उपराजधानी नागपूर ते राजधानी मुंबई हा चौदा तासांचा प्रवास अवघ्या आठ तासांत पूर्ण होईल, असा गवगवा झालेल्या या महामार्गावर अपघातांचा वेगही मोठा आहे.

गेल्या २०३ दिवसांत ४५० अपघातांमध्ये या मार्गाने ९७ बळी घेतले आहेत. उद्घाटनापूर्वीच त्यावर अपघातांना सुरवात झाली होती. रस्ते जेवढे वेगवान होतील तेवढी अपघातातही वाढ होतेच.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरही अपघात नित्याचेच झाले आहेत. ज्या अपघातात मोठ्या संख्येने बळी जातात किंवा कुण्या सेलिब्रिटीचे प्राण जातात त्यावेळी रस्ते अपघात थांबणे किती आवश्यक आहे, यावर चर्चा होते आणि पुन्हा मोठा अपघात होईस्तोवर त्यावर ठोस काहीच होत नाही.

भारतातील रस्ते अपघातांबाबत जगभरात चिंता व्यक्त केली जाते. विविध अहवालांतील आकडेवारीही विचार करायला भाग पाडणारी अशीच आहे. देशात आजघडीला दर चार मिनिटांना एक अपघात होतो.

वर्षभरात साडेचार लाखांहून अधिक अपघातांत सुमारे दीड लाखांहून अधिक व्यक्तींचा बळी जातो. जगातील अनेक देशांत आपल्यापेक्षा वाहनांची संख्या अधिक आहे. मात्र, तेथे अपघातांचे आणि त्यातील जीवितहानीचे प्रमाण कमी आहे.

मानवी जीविताला सर्वोच्च महत्त्व देणाऱ्या यंत्रणा आणि व्यवस्था सक्षमपणे चालवणे हे कोणत्याही सरकारचे उद्दिष्ट असायला हवे. ते केवळ कागदावर नको. आपल्याकडे नेमके तेच होत आहे. एकूण रस्त्यांच्या तुलनेत अवघे पाच टक्के असलेल्या राष्ट्रीय महामार्गांवर एकूण अपघातांपैकी ६० टक्के मृत्यू होतात.

विशेष म्हणजे मृत्युमुखी पडणाऱ्यांमध्ये घरातील कर्ती मंडळीच अधिक असतात. अपघातांमागील कारणांमध्ये प्रामुख्याने अतिवेग आणि चालकाची चूक ही प्रमुख कारणे आहेत. वाहनांची सुस्थिती, वाहतूक नियमांचे उल्लंघन, महामार्गांवरील सुविधा, सीटबेल्ट न बांधणे, अतिभार वाहून नेणे आदी कारणांमुळेच अधिक अपघात होतात.

बहुतेक अपघातांमध्ये मानवी चुका असतात, हे वारंवार स्पष्ट झाले आहे. तरीही आपण कोणताही धडा घेत नाही. वाहनांची सुरक्षितता हासुध्दा एक मोठा मुद्दा आहे. समृध्दी महामार्गावरील ताज्या अपघातामुळे स्लिपर कोच बसगाड्यांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

अपघात झाल्यास स्लिपर कोचमधून बाहेर पडणे जवळपास अशक्य असते आणि त्यात आग लागल्यास परिस्थिती अधिक बिकट होते. ज्या बाजूने बाहेर पडण्याचा दरवाजा असतो त्याबाजूनेच बस पलटल्यास बाहेर निघणे जवळपास अशक्य असते.

प्रवासी झोपेत असल्यास ते शक्यच होत नाही. त्यामुळे स्लिपर कोचला परवानगी कोणत्या आधारे दिली, याचीही चौकशी व्हायला हवी. कोणताही अपघात झाल्यानंतर त्याला खूप वेगवेगळी कारणे दिली जातात.

आताही या अपघातामागे रस्त्याचे कारण नसल्याचे म्हटले जाते. मात्र, रस्ता हे एकमेव कारण नसले तरी समृध्दी महामार्गावर सर्व आलबेल आहे असे नाही. देशातील पहिला कॉरिडॉरमुक्त महामार्ग म्हणून गौरविला गेला. तसेच 'इंटलिजेन्ट ट्रॅफिक मॅनेजमेंट' असणारा हा महामार्ग असेल त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाही, असाही दावा केला जातो.

सध्या समृध्दी महामार्गाचा शिर्डीपर्यंतचा टप्पा पूर्ण झाला आहे आणि पुढील टप्प्याचे काम सुरू आहे. त्यामुळे 'इंटलिजेन्ट ट्रॅफिक मॅनेजमेंट' कार्यान्वित नाही. या महामार्गावर अपघात झाल्यास तातडीने मदतीची शक्यता नाही.

दूरदूरपर्यंत कोणत्याही सुविधा नाहीत. पोलिस व वैद्यकीय मदत मिळण्यात अडचणी आहेत. रस्ता सरळ रेषेत असल्याने ड्रायव्हरला आपोआप डुलकी लागण्याचा धोका बळावतो. याशिवाय वाहनांची स्थिती, टायर व त्यातील हवा आदी मुद्देही महत्त्वाचे आहेत. विनायक मेटे आणि सायरस मिस्त्री या बड्या व्यक्तींच्या मृत्यूनंतर रस्ते अपघातांवर चर्चा झाली.

आप्तांचे मृतदेहसुध्दा डोळयांनी न पाहता त्याचा कोळसाच बघावा लागल्याने नातेवाइकांचा आक्रोश डोळयांसमोरून हटत नाही. आतातरी आपण सर्वांनीच अपघात टाळण्याची जबाबदारी स्वीकारायला हवी. त्यासाठीच्या सर्व उपाययोजना करण्याची गरज आहे.

# सद्गुरूची कामगिरी

सद्गुरूची कामगिरी कोणती ? आरशावर धूळ पडलेली असते, ती बाजूला सारायला सद्गुरू सांगतात; आपले चुकते कुठे ते सद्गुरू सांगतात. सद्गुरू आपल्याला मार्गाला लावतात. स्वप्नामध्ये तलावात पडला म्हणून ओरडू लागला, तोच जागा झाल्यावर ओरडायचा थांबला ! सद्गुरू जागे करण्याचे काम करतात. मला करायचेच काही उरले नाही असे ज्याने म्हटले, त्याने सद्गुरू खरोखर केला असे म्हणावे. एखादा सुखवस्तू गृहस्थ 'मी स्वस्थ आहे' असे म्हणतो, पण ते काही खरे नाही. मन जोवर गिरक्या मारते तो पर्यंत तो स्वस्थ आहे असे नाही म्हणता येणार.शिष्याच्या भावनाच गुरूला गुरुपद देतात. जो शरण जातो त्याचा कार्यभार सद्गुरू उचलतो. ज्याची दृष्टी रामरूप झाली तो खरा गुरू. जे चिरकाल टिकते ते गुरुपद समजावे. खरोखर, सद्गुरु म्हणजे मूर्तिमंत नामच होय. गुरूने सांगितलेले अक्षरशः पाळणे हेच खरे साधन. संत कुणालाही देहाने कायमचे लाभले नाहीत. संतांना भगवंताचा जो ध्यास असतो तो महत्त्वाचा आहे. पुष्कळांना संतांची गाठ पडते, परंतु सत्संगतीचे महत्त्व न कळल्यामुळे बहुतेकांना त्यापासून जो व्हायला पाहिजे तो फायदा होत नाही. आपली जी कर्तव्ये ठरली आहेत ती आपण बरोबर करावीत. व्यापार थोडक्या प्रमाणात केला तर पुढे वाढतो, त्याप्रमाणे कर्तव्य करीत गेल्याने फळाची आशा आपोआपच सुटेल. आपले कर्तव्य कोणते ते सद्गुरू आपल्याला दाखवून देतात.रथ आहे खरा, पण जर त्याला सारथी म्हणजे चालवणारा नसेल, तर रथ कुठेतरीच जाईल. केवळ 'गाडी माझी आहे' म्हणून ती मालकाला चालविता येणार नाही. साधी बैलगाडी सुध्दा चालविता येणार नाही. आपला देह मनुष्य आपल्या मनाने चालवितो, आणि खड्ड्यामध्ये पडतो. सद्गुरू हे गाडीवानाचे काम करतात आणि आपल्या देहरूपी गाडीला योग्य रस्त्यावरून नेतात. आपण नेहमी भगवंताच्या अनुसंधानात मग्न असावे आणि गाडीवानावर विश्वास ठेवून निर्धास्त असावे, मग कसलाच धोका उरणार नाही; आपल्या नशिबात जेवढे मिळायचे असेल तेवढेच आपल्याला मिळणार, अशी वृत्ती बनून आपले हवेपण कमी होईल.मनाची ही वृत्ती झाली की, जे घडेल ते भगवंताच्या इच्छेनेच घडेल असे आपल्याला वाटू लागेल. असे वाटू लागले की समाधान चालत घरी येईल. पण हे सगळे होण्यासठी आपल्या अंतःकरणाची शुध्दता हा पाया आहे.

# एकीकडे प्रवाशांचा होरपळून मृत्यू तर दुसरीकडे अचानक शपथविधी हे कसे काय?

दिनांक 1 जुलै 2023 रोज शनिवारला समृध्दी महामार्गावर अंगावर शहारे येणारी भयावह घटना घडली व यात 25 प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला.यामुळे महाराष्ट्रासह संपूर्ण भारत स्तब्ध झाला व सर्वत्र शोककळा पसरली व यांचे पडसाद जगभर पसरले.मृतांचा अंतिमसंस्कारसुध्दा व्हायला असतांना.अचानक दिनांक 2 जुलैला 2023 रोज रविवारला अचानक दुपारी राजकीय उलथापालथ दिसून आली.या उलथापालथमध्ये शोकाकुल परिवार आपल्या शोकामध्ये डुबून आहे व अजुन पर्यंत शोक सावरलेला नाही.परंतु राजकीय पुढारी राजकीय खेळीसाठी व स्वतःच्या स्वार्थापोटी शोकाकुल परिवाराकडे पाठ फिरविल्याचे दिसून येते व स्वतः खुशी साजरी करतांना दिसतात.याकरीता मीडिया समोर येवून व प्रेस कॉन्फरन्स घेऊन आपली खुशी जाहीर करतात व मत मांडताना दिसतात.परंतु लोकप्रतिनिधींना मृतांच्या नातेवाईकांच्या घरापर्यंत जाण्यास वेळ नाही.मृतांच्या नातेवाईकांच्या जखमा ताज्या असतांना अशाप्रकारची राजकीय खेळी खेळने म्हणजे लोकप्रतिनिधी या नावाला कलंकित केल्या सारखे आहे.ही कसली मानुसकी व कसले लोकप्रतिनिधी म्हणावे!कारण आज महाराष्ट्र सरकार व सरकारमध्ये सहभागी झालेला राष्ट्रवादी पक्ष यामुळे राजकीय वर्तुळात खुशीने आणि आनंदाचे वातावरण दिसून आले.राष्ट्रवादी पक्षाच्या आमदारांना मंत्रीपदाची वर्नी लागल्याने राज्यात अनेक ठिकाणी गुलाल सुध्दा उधळण्यात आला याला कोणते राजकारण म्हणावे.घरचा कोणीही व्यक्ती मृत पावतो तेव्हा संपूर्ण परिवार कमीत कमी तीन दिवस शोकमनवीतो नंतर दुसरे कार्य करतो.परंतु सर्वांच्या सामोरं समृध्दी महामार्गवर खाजगी बसचा भीषण अपघात झाला व यात होरपळून 25 प्रवाशांचा अंत झाला.यामुळे महाराष्ट्रासह देशात शोक सुरू असतांना महाराष्ट्राचे लोकप्रतिनिधी मंत्रीपदाची शपथ घेतात व खुशी जाहीर करतात यापेक्षा जनमानसाचे मोठे दुःख कोणते म्हणावे!पंतप्रधान नरेंद्र मोदींनी दिनांक 27 जून 2023 ला विरोधकांवर 20 लाख कोटीच्या भ्रष्टाचाराचा आरोप लावला होता यात कॉंग्रेस, राष्ट्रीय जनता दल, तृणमूल कॉंग्रेस व मुख्यत्वे करून राष्ट्रवादी कॉंग्रेस याची भ्रष्टाचाराची यादी लांबलचक असल्याचे मोदींनी म्हटले.यामुळे राष्ट्रवादी नेत्यांचे धाबे दणाणले.कारण आज ज्यांनी-ज्यानी मंत्रीपदाची शपथ घेतली ते सर्वच भ्रष्टाचारात गुरफटलेले आहेत व जेही राष्ट्रवादीचे आमदार सत्तेसोबत गेले आहेत त्यांच्यामागे ईडीसह अनेक कारवाया सुरू आहे.यावर पांघरूण घालण्यासाठी राष्ट्रवादीचे आमदार शिंदे सरकारमध्ये सामील झाले.परंतु मानुसकी या नात्याने मृतांच्या नातेवाईकांना व शोकाकुल परिवाराला विसरल्याचे दिसून येते.कोणत्याही पक्षांच्या राजकारण्यांनी राजकारण अवश्य करावे व खेळावे.परंतु परिस्थितीत पाहुन राजकीय डावपेच खेळले तर बरं राहील.अन्यथा लोकांचा राजकारण्यावरून विश्वास उडेल.महाराष्ट्राच्या राजकारणात सत्तेसाठी इतका लालचीपणा कधीच दिसला नाही.एकिकडे अंत्यविधीचा शोक तर दुसरीकडे

# महाराष्ट्रात सर्वांना मोफत उपचार?

'सर्वासाठी आरोग्य' हे उद्दिष्ट सरकारला गाठायचे असेल तर गरज आहे ती आरोग्यसेवेवरील खर्च वाढवण्याची. तो न वाढवता नुसत्याच मोठमोठ्या योजना जाहीर करणे म्हणजे मृगजळामागे धावण्यासारखे आहे. महाराष्ट्र सरकारने नुकतेच जाहीर केले आहे की आता आयुष्मान भारत आणि महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना एकत्रित राबवल्या जातील. सर्व रेशनकार्ड धारकांना या दोन्ही योजनांची संयुक्त कार्डे देण्यात येतील; तसेच पाच लाख रु.पर्यंत शस्त्रक्रियांसह उपचार मोफत करण्यात येतील. ही बातमी वाचून समज होऊ शकतो की या सर्व लाभधारकांवरील वैद्यकीय खर्चाचा बोजा संपेल. याबाबतची खरी परिस्थिती काय आहे व आरोग्य-विमा योजनेबाबत कोणते प्रश्न आहेत हे थोडक्यात पाहू.

बहुसंख्य रुग्ण कोरडेच राहणार!

या योजना फक्त रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांसाठी म्हणजे एकूण रुग्णांच्या फक्त तीन टक्के रुग्णांसाठी आहेत. महापात्रा, खेत्रपाल आणि नागराज या तिघांनी महाराष्ट्राबाबतीत केलेल्या संशोधनाच्या आधारे आरोग्य-खर्चाबाबत खालील चित्र उभे राहते. महाराष्ट्रात नागरिकांच्या खिशातून दरडोई वर्षाला सरासरी सुमारे ३५०० रु. खर्च होतात तर महाराष्ट्र सरकार १२०० रु. खर्च करते. या ३५०० रु. आरोग्य-खर्चापैकी नागरिक सुमारे २३०० रु. खासगी डॉक्टर्सच्या दवाखान्यावर तर १२०० रु. खासगी हॉस्पिटलवर खर्च करतात. म्हणजे महाराष्ट्रातील १२ कोटी जनता वर्षाला एकूण सुमारे २७ हजार कोटी रु. खासगी डॉक्टर्सच्या दवाखान्यावर खर्च करते. आरोग्य-विमा योजनांमुळे हा बोजा अजिबात कमी होणार नाहीय. महाराष्ट्रातील लहान-मोठ्या सुमारे तीन हजार रुग्णालयांपैकी या योजनांमध्ये सुमारे एक हजार सामील आहेत. बाकीच्या रुग्णालयांमध्ये या योजना लागू नाहीत. सुमारे १४०० प्रोसीजर्स व खास उपचार यांना त्या लागू आहेत. पण उदा. सिझेरिअयन शस्त्रक्रिया, डेंगीचे सामान्य रुग्ण यांच्यासाठी ही योजना लागू नाही.

मुळात रुग्णालयातील सर्व रुग्णांना मोफत सेवा देण्यासाठी या योजना आलेल्या नाहीत. जागतिक बँकेने आरोग्य-सेवेच्या खासगीकरणाचे धोरण आपल्या गळी उतरवले. त्याचा भाग म्हणून आरोग्य-विमा योजनांचे धोरण आपल्या सरकारच्या गळ्यात बांधताना त्यांनी मांडले होते की रुग्णालयांची फक्त काही बिले 'संकट-समान' (catastrophic) असतात. रुग्णालय-खर्च हा त्या कुटुंबाच्या एकूण घर-खर्चाच्या १० टक्क्यांपेक्षा जास्त झाला तर तो 'संकट-समान' मानायचा. (कारण अशा खर्चामुळे ते कुटुंब वर्षांनुवर्षे कर्जाच्या सापळ्यात सापडते.) अशा 'संकट-समान' रुग्णालय-खर्चापासून रुग्णाला वाचवण्यासाठी आरोग्य-विमा कवच उभारणे एवढेच सरकारने करावे. रुग्ण बाकीच्या रुग्णालय-खर्चाला तोंड देऊ शकतात. मात्र अशा विमा योजनांबाबत निरनिराळ्या राज्यांबाबतचे अभ्यास सांगतात की त्या लागू केल्यानंतर 'संकट-समान' खर्च कमी होतोच असे नाही. उलट काही



ठिकाणी रुग्णांना करावा लागणारा रुग्णालयाचा खर्च या योजनेचा लाभ घेण्यामुळे वाढला. कारणे अनेक आहेत. पण महत्त्वाचे कारण म्हणजे या योजनेअंतर्गत सरकारने खासगी रुग्णालयाला देऊ केलेल्या पॅकेजमध्ये सरकारचे पैसे फार कमी आहेत, असे म्हणत अनेक खासगी रुग्णालये रुग्णाला वर पैसे भरायला सांगतात. खासगी आरोग्य-सेवा फार महाग झाल्याने या योजना असूनही महाराष्ट्रात रुग्णालयामध्ये दाखल झालेल्यांपैकी सुमारे २०-२५ टक्के रुग्णांना 'संकट-समान' खर्चाला तोंड द्यावे लागते.

या योजनांमुळे लाखो लोकांना महागडे उपचार खासगी रुग्णालयामध्ये करून मिळाले, जे एरवी त्यांना परवडले नसते. पण त्याचबरोबर महाराष्ट्राबाबतचा अभ्यास हेदेखील सांगतो की, हे सर्व मोफत व्हावे अशी योजना असली तरी हे प्रश्न असताना आणि आरोग्य-विमा योजनेची मूळ उद्दिष्टे साध्य झाली नसताना त्यांचा पुनर्विचार होत नाहीय. म. फुले योजना व 'पंतप्रधान जन आरोग्य योजना' ही आरोग्य-विमा योजना एकत्रित केल्यामुळे या परिस्थितीत कितपत सुधारणा होईल हे पाहू.

'पंतप्रधान जन आरोग्य योजना' ही केंद्र सरकारची आरोग्य-विमा योजना २०१८ च्या केंद्रीय अर्थसंकल्पामार्फत 'जगातील सर्वात मोठी आरोग्य-योजना' म्हणून जाहीर झाली. 'आयुष्मान भारत' या योजनेचा ती भाग आहे. दारिद्र्यरेषेखालील ५० कोटी जनतेला या योजनेमार्फत पाच लाखांचे आरोग्य-सेवा कवच देण्याचे जाहीर झाले. त्यासाठी किमान ३० हजार कोटी रु. आवश्यक असताना पहिल्या वर्षी फक्त ३२०० कोटी रु.ची तरतूद केली! या ५० कोटी गरिबांपैकी वर्षाला २.३ कोटी गरिबांना रुग्णालयामध्ये उपचार घेण्याची गरज असताना पहिल्या वर्षी फक्त दहा लाख गरिबांना लाभ मिळाला! दुसऱ्या वर्षी ६४०० कोटी रु.ची तरतूद केली गेली! २०२२-२३ पर्यंत ती तेवढीच राहिली; त्यातील निम्मीच वापरली गेली. या वर्षासाठी म्हणजे २०२३-२४ साठी ती ७२०० कोटी रु. केली. गरजेच्या एकपंचमांश निधी असलेल्या केंद्र-सरकारच्या या योजनेची जोड म. फुले योजनेला मिळाल्याने फार मोठी भर पडणार नाहीय.

पिवळे व केशरी रेशनकार्ड धारकांसाठी कुटुंबामागे वर्षाला १.५ लाख रु.चे आरोग्य-कवच म. फुले योजनेमार्फत होते. ते महाराष्ट्र सरकारच्या यंदाच्या अर्थसंकल्पात पाच लाखांवर नेले. मात्र त्यासाठीची तरतूद ८८१ कोटी रुपयांवरून ५६४ वर म्हणजे ती ३५ टक्क्यांनी घटली! आता पंतप्रधान जन आरोग्य योजनेची जोड देऊन फक्त पिवळे व केशरी कार्डधारकांना नव्हे तर सर्व रेशनकार्ड धारकांना पाच लाखांचे आरोग्यसेवा-कवच देण्याचे जाहीर केले आहे. पण हे वाढीव ध्येय गाठण्यासाठी किती निधी आवश्यक आहे व किती मिळणार आहे हे जाहीर केलेले नाही.

आरोग्य-विमा योजना हे उत्तर नाही

एकंदरीत महाराष्ट्र सरकारचा आरोग्यावरील खर्च गरजेच्या मानाने मुळात फार कमी आहे. महाराष्ट्रातील सरकारी आरोग्य-सेवा तुटपुंजी, कुपोषित व आजारी असण्यामागचे हे सर्वात महत्त्वाचे कारण आहे. 'सर्वासाठी आरोग्य' हे ध्येय गाठण्यासाठी सार्वजनिक आरोग्य खर्च सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या पाच टक्के असावा असे जागतिक आरोग्य-संघटना म्हणते. २०११ मध्ये बाराव्या पंचवार्षिक योजनेसाठीच्या रेड्डी समितीने तो निदान तीन टक्के करावा असे म्हटले. तर मोदी सरकारच्या निती आयोगाने तो २०२५ पर्यंत तो अडीच टक्के करावा असे म्हटले. पण भारत सरकारचा हा खर्च अजूनही दीड टक्काही नाही! महाराष्ट्रात तर तो राज्य-उत्पादनाच्या ०.८ टक्के आहे! महाराष्ट्रातील सरकारी आरोग्य-सेवेचा दर्जा सुधारून सरकारी तज्ज्ञांनी बनवलेल्या 'इंडियन पब्लिक हेल्थ स्टँडर्ड'नुसार तो राखायचा असेल तर एका सरकारी तज्ज्ञ अहवालानुसार हा खर्च राज्य उत्पादनाच्या १.८ टक्के करायला हवा म्हणजे आजच्यापेक्षा निदान दुप्पट करायला हवा. पण त्या दृष्टीने कोणतीच हालचाल नाही. महाराष्ट्र सरकारची आरोग्यासाठीची तरतूद मुळातच अगदीच तुटपुंजी आहे. शिवाय त्यापैकीही सर्व पैसे खर्च होत नाहीत! उदाहरणार्थ - २०२१-२२ मध्ये वित्तीय वर्षाचे साडेदहा महिने पूर्ण झाल्यावरही महाराष्ट्राच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने आरोग्य-तरतुदीच्या केवळ ४६.७ टक्के रक्कम खर्च केली होती. तर राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानसाठी केंद्र सरकारकडून आलेल्या २४७२ कोटी रु.पैकी फक्त ४१.३ टक्के खर्च झाले!

# ठाणे प्रवासासाठी चार ते पाच तास नोकरदारांची हजेरी अर्धवेळ, महिलांचे सर्वाधिक हाल

ठाणे : ठाणे,पालघर जिल्ह्यातील अवजड तसेच हलक्या वाहनांसाठी महत्त्वाच्या असलेल्या मुंबई अहमदाबाद मार्गा वरील वर्सोवा पूलाजवळ साचलेल्या पाण्यामुळे मागील तीन दिवसांपासून प्रचंड ठाण्यातील गायमुख ते वसई येथील चिंचोटी पर्यंत वाहतूक कोंडी होत आहे. या वाहतूक कोंडीमुळे वाहन चालकांना अवघ्या तासाभराच्या अंतरासाठी सुमारे चार ते पाच तास लागत आहे. वेळेत कामावर पोहचत नसल्याने नोकरदारांची अर्धवेळ हजेरी लागत आहे. प्रवाशांना कोंडीचा शारिरिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. महिलांचे कोंडीत अडकल्याने सर्वाधिक हाल होत आहे. अनेक रुग्णवाहिका, अत्यावश्यक सेवेतील वाहनेही कोंडीत अडकत आहे. मुंबई अहमदाबाद मार्गा वरून हजारो वाहनांची वाहतूक वसई, विरार, बोरीवली, ठाण्याच्या दिशेने होत असते. त्यामुळे हा मार्ग वाहतूकीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. भिवंडी, उरण जेएनपीटी येथून घोडबंदर मार्गे गुजरातच्या दिशेने जाणाऱ्या अवजड वाहनांची वाहतूकही या मार्गा वरून सर्वाधिक होत असते. ठाणे शहरात कामानिमित्त येणारे अनेकजण रेल्वेगाड्यांतील गर्दीचा प्रवास टाळण्यासाठी रस्ते मार्गे ठाणे गाठत असतात. बुधवारी ठाणे आणि पालघर जिल्ह्यात पडलेल्या पावसामुळेही वर्सोवा, पूलाजवळ सखल भागात गुडघाभर पाणी साचले आहे. मागील तीन दिवसांपासून या पाण्याचा निचरा होत नसल्याने ठाण्यातील घोडबंदर मार्गा वरील गायमुख ते मुंबई अहमदाबाद मार्गा वरील चिंचोटीपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. वसई येथून घोडबंदर, ठाणे अनेक नोकरदार कामानिमित्ताने येत असतात. वाहतूक कोंडीमुळे या नोकरदारांचे हाल होत आहे. वसईहून ठाण्यात येण्यासाठी किमान चार ते पाच तास लागत आहेत. यापूर्वी एक ते दीड तासात ठाणे गाठता येत होते. वाहतूक कोंडीमुळे अनेकजण कार्यालयात जाणे टाळत असून त्यांच्यावर घरून काम करण्याची वेळ आली आहे. तर काहीजण सकाळी ८ ते ९ वाजता घर सोडूनही दुपारी १ नंतर कार्यालयात पोहचत आहेत. वाहतूक कोंडीचा शारिरिक आणि मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.



# अश्लील व्हिडिओ पाहून पत्नीशी अनैसर्गिक संबंध अन् लग्न दुसरीशी; पोलिसात गुन्हा दाखल

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात एक संतापजनक प्रकार समोर आला आहे. अश्लील व्हिडीओ पाहून पत्नीशी अनैसर्गिक शारीरिक संबंध ठेवत दुसऱ्याच महिलेसोबत कोर्टात लग्न करणाऱ्या पतीसह सासरच्या मंडळींवर मुकुंदवाडी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिलेने पोलिसात धाव घेत दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित महिलेने पोलिसांत दिलेल्या फिर्यादीनुसार तिचे लग्न 2018 साली झाले होते. यानंतर तिच्या पतीने तिला काही दिवस चांगले वागवले. मात्र त्यानंतर किरकोळ कारणावरून शिवीगाळ व मारहाण करण्यास सुरुवात केली. मोबाईलमध्ये असलेल्या अश्लील व्हिडिओ प्रमाणे अनैसर्गिक शरीर संबंध करीत त्रास दिला. त्यानंतर काही दिवसांनंतर त्याने दुसऱ्या एका महिलेसोबत कोर्टात दुसरे लग्न केले. याच काळात तक्रारदार महिलेच्या सासू-सासरयांनी माहेरून शाळा सुरू करण्यासाठी चार लाख रुपये घेऊन ये नाहीतर तुला नांदवणार नाही अशी तिला धमकी दिली. रात्रीच्या वेळी उपाशी पोटी ठेवून शारीरिक व मानसिक त्रास दिला. त्यामुळे या सततच्या त्रासाला कंटाळून तिने मुकुंदवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव हे पुढील तपास करीत आहेत. अत्याचार करणाऱ्याला 14 वर्षे सक्तमजुरीची




दुसऱ्या एका घटनेत अत्याचार करणाऱ्याला 14 वर्षे सक्तमजुरीची शिक्षा न्यायालयाने सुनावली आहे. विवाहिता आणि तिच्या मुलाचे अपहरण करून मुलासमोरच विवाहितेला मारहाण करीत अत्याचार करणारा आरोपी चरण प्रेमसिंग सुलावणे (25, रा. सुलिभंजन, ता. खुलताबाद) याला जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. ए. सिन्हा यांनी 14 वर्षे सक्तमजुरी आणि विविध कलमांखाली 21 हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली आहे. आरोपीला ठोठावलेल्या दंडाची रक्कम नुकसानभरपाई म्हणून पीडितेला देण्याचे, तसेच विधी व न्याय विभागानेदेखील योग्य तो मोबदला पीडितेला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

# मागाठाणे मेट्रोलगतची जागा पुन्हा खचली; याला जबाबदार कोण?



मुंबईत काही दिवसांत मुसळधार पावसामुळे (Mumbai Rain) अनेक ठिकाणी पाणी साचल्याचं समोर आलं आहे. त्यातच मुंबईत मुसळधार पावसामुळे बोरिवलीतील मागाठाणे मेट्रो (Magathane Metro) स्टेशन परिसरातील जागा खचतानाचा दुसरा धक्कादायक व्हिडीओ समोर आला. मेट्रो स्टेशनजवळचा काही भाग मुसळधार पावसामुळे अक्षरशः खचला अन् मेट्रो स्थानकालाही धक्का लागला असल्याचं हा व्हिडिओ पाहिल्यावर वाटतं. मात्र मागाठाणे मेट्रो स्टेशन लगत जमीन खचली कशी? आणि याला जबाबदार कोण? बोरिवलीतील मागाठाणे मेट्रो स्टेशनजवळ भूस्खलनाचा दुसरा प्रकार बुधवारी (28 जून) घडला. पाऊस पडत असताना त्याचवेळी मेट्रो स्टेशनजवळ खोदलेल्या खड्ड्यात मेट्रो स्टेशनच्या पायऱ्यांजवळचा काही भाग खचला. सुदैवाने या घटनेत कोणीही जखमी झालेलं नाही. पण थेट मेट्रो स्टेशन लगतची जागा खचल्याने या घटनेवर चिंता व्यक्त केली जात आहे. अजून संपूर्ण पावसाळा बाकी आहे, पावसाला आताच सुरुवात झाली अन् ही घटना घडली. त्यात थेट मेट्रो स्टेशनला लागूनच असलेली जमीन खचल्यामुळे मेट्रो स्टेशनही खचण्याची शक्यता आहे. त्यामुळे या घटनेकडे गांभीर्याने बघण्याची जास्त आवश्यकता आहे. तज्ज्ञांच्या माहितीनुसार, मेट्रो स्टेशनलगतच्या जमिनीला कोटिंग न केल्यामुळे आणि काही इतर कारणास्तव जमीन खचली, त्यामुळे मेट्रो स्टेशनच्या पायात याचे परिणाम होण्याची शक्यता आहे. या प्रकरणी एमएमआरडीए, महापालिका, मेट्रो आणि बिल्डर या चौघांचीही चुकी आहे, त्यामुळे संबंधितांवर कारवाई व्हावी, अशी मागणी स्थानिक आमदार प्रकाश सुर्वे यांनी मेट्रो परिरसरात पाहणी करताना केली.

# मद्य तस्करी किंग दिनू डॉनला सहा महिन्यानंतर परभणीतून बेड्या, धुळे पोलिसांची कामगिरी

धुळे: संपूर्ण राज्यभरात मद्य तस्करीचे अनेक कारनामे करणारा धुळे जिल्ह्यातील शिरूड येथील रहिवासी असणारा दिनेश गायकवाड उर्फ दिनू डॉन याच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून धुळे तालुका पोलीस गायकवाडच्या मागावर होते. अखेर सहा महिन्यांनंतर तालुका पोलिसांनी त्याला अटक केली आहे. नाशिकसह महाराष्ट्रातील गुटखा तस्करीचे रॅकेट चालविणाऱ्या गुटखा किंग म्हणून ओळख असलेल्या तुषार जगताप यास शिताफीने पोलिसांनी अटक केली. हे प्रकरण ताजे असतांनाच आता धुळे तालुका पोलिसांनी मद्य तस्करीत किंग असलेल्या दिनेश गायकवाडच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत. धुळे तालुका पोलीस ठाण्याच्या पथकाने परभणी जिल्ह्यातील गंगाखेड



येथे बस स्थानकाजवळ त्याला ताब्यात घेतले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून धुळे जिल्ह्यातून मद्य तस्करीच्या अनेक घटना समोर येत आहेत. अनेकदा पोलिसांनी तस्करांचा पाठलाग तस्करी हाणून पाडली आहे. अशातच मद्य तस्करीची आंतरराज्य टोळी चालवणाऱ्या या दिनेश गायकवाडवर कारवाई करण्यात आल्यानंतर राज्यभरात विविध ठिकाणी केलेली मद्य तस्करी समोर येणार आहे. राज्यातील विविध शहरात बनावट दारू तयार करून त्याची विक्री करणाऱ्या दिनेश गायकवाड याच्याविरुद्ध धुळे तालुका पोलीस ठाण्यात डिसेंबर 2022 मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला होता. धुळे तालुक्यातील कावठी येथे सुरू असलेला बनावट मद्याचा कारखाना तालुका पोलिसांनी उद्धवस्त केल्यानंतर याप्रकरणी नऊ जणांना ताब्यात घेण्यात आले होते. मात्र त्यातील मुख्य संशयित असलेला दिनेश गायकवाड हा गेल्या अनेक दिवसांपासून पोलिसांच्या हातावर तुरी देऊन फरार होण्यात यशस्वी होत होता.

अखेर धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांनी तांत्रिक माहितीच्या आधारे पाठपुरावा करत त्याचा शोध घेण्यास सुरुवात केली होती. अखेर तब्बल सहा महिन्यानंतर दिनेश गायकवाड याला ताब्यात घेण्यात तालुका पोलिसांना यश आले आहे. या कारवाईमुळे बनावट मद्याची तस्करी करणाऱ्या टोळीमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. महाराष्ट्राच्या ब्रँडेड बाटलीत गोव्याची हलकी दारु ब्रँडेड दारुच्या नावाखाली बनावट दारु विक्रीचे प्रकार अनेकदा समोर आले आहे. दरम्यान असाच काही प्रकार छत्रपती संभाजीनगर (Chhatrapati Sambhaji Nagar) जिल्ह्यात देखील समोर आला आहे. गोव्याची हलकी दारु महाराष्ट्रातील ब्रँडेड बाटलीत भरणाऱ्या टोळीतील मुख्य सूत्रधारासह दोघांना राज्य उत्पादन शुल्क विभागाने बेड्या ठोकल्यानंतर हा सर्व प्रकार समोर आला आहे. ज्यात एक स्कोडा कारचा मालक आणि त्याच्या साथीदाराचा त्यात समावेश आहे. त्यांच्याकडून आणखी एक कार व मोबाईल, असा 11 लाख 10 हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाने 26 जून रोजी ही कारवाई केली आहे.

## दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर भाजपचा मोर्चा रद्द

**मुंबई :** बुलढाणा दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर भाजपने शनिवारचा मोर्चा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई भाजप अध्यक्ष आशीष शेलार यांनी या भीषण दुर्घटनेवर शोक व्यक्त करत मोर्चा रद्द केल्याचे जाहीर केले. त्यामुळे भाजपचे 'आक्रोश आंदोलन' आजच्या दिवशी स्थगित करण्यात आले आहे. मुंबईकरांना ज्यांनी गेली २५ वर्षे लुटले, त्यांना प्रश्न विचारणारे आंदोलन आजच्या दिवशी स्थगित केले असले तरी आम्ही त्यांना प्रश्न विचारत राहू, अशी प्रतिक्रिया शेलार यांनी दिली आहे.




## जून २३ मध्ये विक्रमी जीएसटी संकलन

**नवी दिल्ली :** अर्थ मंत्रालयाने शनिवारी १ जुलै रोजी जून २०२३ या महिन्याचा जीएसटी डेटा जाहीर केला आहे. सरकारी आकडेवारीनुसार, सरकारला जून २०२३ मध्ये जीएसटीमधून १.६१ लाख कोटी रुपये मिळाले आहेत. जे मागील वर्षाच्या तुलनेत १२ टक्क्यांनी वाढले आहेत. यापूर्वी मे महिन्यात सरकारला जीएसटीमधून १.५७ लाख कोटी रुपयांचा महसूल मिळाला होता. मे २०२३ मध्ये सरकारी तिजोरीला मिळालेली ही कमाई एका वर्षापूर्वी म्हणजेच मे २०२२ च्या तुलनेत १२ टक्के अधिक होती. मे महिन्यापूर्वी म्हणजेच एप्रिल महिन्यात जीएसटीने आतापर्यंतचा सर्वोत्तम विक्रम केला होता. एप्रिल महिन्यात सरकारला जीएसटीमधून १.८७ लाख कोटी रुपयांची कमाई झाली. सरकारला जीएसटीमधून भरघोस कमाई होत असल्याचे आकडे दाखवतात.

## 'समृद्धी'वरील बस अपघातात २६ प्रवाशांचा होरपळून मृत्यू

# अपघात टाळण्यासाठी घेणार तज्ज्ञांचा सल्ला : मुख्यमंत्री

समृद्धी महामार्गावरील प्राणघातक अपघात रोखण्यासाठी या महामार्गाचा तज्ज्ञांमार्फत अभ्यास करून त्यांच्या चनेनुसार प्रभावी उपाययोजना अमलात आणल्या जातील', अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी दिली.

समृद्धी महामार्गावर देऊळगाव राजा येथे खासगी बसने अपघातानंतर पेट घेऊन झालेल्या दुर्घटनेत २६ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला. या घटनास्थळाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट दिली. त्यावेळी पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, 'समृद्धी मार्गावरील अपघात हा दुर्दैवी आहे. समृद्धी महामार्गावरील अपघात अतिवेग आणि वाहनचालकांना डुलकी लागणे आदी कारणांमुळे घडतात. यापुढे असे अपघात घडू नयेत, यासाठी प्राधान्याने उपाययोजना करण्यात येतील'. अपघात घडताच स्थानिक यंत्रणा अपघातस्थळी पोहोचली. मात्र बसचा मुख्य दरवाजा बंद असल्यामुळे प्रवाशांना बाहेर येता आले नाही. त्यामुळे मृतांच्या संख्येत वाढ झाल्याची माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. खासगी बसमधून जादा प्रवासी वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. समृद्धी महामार्गावरील वाहतूक नियंत्रित करण्यासाठी यंत्रणा कार्यान्वित आहे. महामार्गावर प्रवेश देण्याआधी वाहनांची तपासणी केली जात असून वाहनचालकाचे समुपदेशन केले जाते.



## जादा प्रवासी वाहतूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाईचा दिला इशारा

### बुलढाण्यात प्रवासी बसचा भीषण अपघात

बुलढाण्यात एका प्रवासी बसचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली असून त्यात २६ प्रवाशांचा जागीच होरपळून मृत्यू झाला असून त्यात चार मुलांचाही समावेश आहे. बसमध्ये एकूण ३३ प्रवासी होते. त्यातील आठ प्रवासी सुखरूप बाहेर पडले आहेत. बसच्या कॅबिनमध्ये दोन ड्रायव्हर होते. त्यातील एक जण झोपला होता, तर दुसरा ड्रायव्हर गाडी चालवत होता. त्यातील एक ड्रायव्हर बचावला असून दुसऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती आहे. बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजाजवळ पिंपळखुटा गावालगत हा अपघात झाला आहे. ही प्रवासी बस नागपूरहून पुण्याला निघाली होती. त्यावेळी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास ही भीषण घटना घडली. या बसमध्ये नागपूर, वर्धा, आणि यवतमाळचे प्रवासी होते. ही बस विदर्भ ट्रॅव्हल्सची होती. ही बस रस्ता दुभाजकाला धडकली आणि त्यानंतर बसने पेट घेतला. डिझेलच्या संपर्कात आल्याने बसने वेगाने पेट घेतला. बचावलेल्यांमध्ये चालक आणि वाहकाचा समावेश आहे. जखमींना जवळच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बस एका लोखंडी पोलवर आदळली व पुढे दुभाजकाला धडकली आणि पलटली. बसचा दरवाजा गाडीखाली आल्याने कोणालाच बाहेर पडता आले नाही. वाचलेले प्रवासी काचा फोडून बाहेर आले.

### जखमींची केली विचारपूस...

अपघातस्थळाला भेट दिल्यानंतर मुख्यमंत्री शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी देऊळगाव राजा येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असलेल्या आठ जखमींची भेट घेऊन आस्थेने विचारपूस केली. अपघातातील जखमींना योग्य तो उपचार करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या. यावेळी मंत्री गिरीष महाजन, संदीपान भुमरे, पालकमंत्री गुलाबराव पाटील, खासदार प्रतापराव जाधव, आमदार संजय रायमुलकर, आकाश फुंडकर, श्वेता महाले, विभागीय आयुक्त निधी पांडेय, विशेष पोलीस महानिरीक्षक जयंत नाईकनवरे, जिल्हाधिकारी डॉ. एच. पी. तुम्मोड, जि. पो. अधीक्षक सुनील कडासने आदी उपस्थित होते.

## 'कोविड' गैरव्यवहारांची चौकशी सुरू झाल्याने विरोधकांचा मोर्चा

# 'मातोश्री १' ते 'मातोश्री २' असा मोर्चा काढण्याची गरज : एकनाथ शिंदे

'कोरोना काळात कोविड सेंटरच्या नावाखाली करण्यात आलेल्या गैरव्यवहारांची 'ईडी'कडून चौकशी सुरू झाल्याने विरोधकांचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळे जनतेची दिशाभूल करण्यासाठी मोर्चा काढला जात आहे. मात्र जनता त्यांच्या या भूलथापांना फसणार नाही. आज काढण्यात आलेल्या मोर्चाचे ठिकाण चुकले आहे. खरा मोर्चा 'मातोश्री १' ते 'मातोश्री २' यादरम्यान काढण्याची खरी गरज होती. कारण जो काही गैरव्यवहार झाला आहे, तो याच ठिकाणी झाला आहे', असा हल्लाबोल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर चढवला. बाळासाहेबांची शिवसेना पक्षात युवासेनेच्या कोअर कमिटीचे राहुल कनाल आणि वर्धा जिल्ह्यातील करंजा नगर परिषदेतील १० नगरसेवकांच्या प्रवेशानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते.

समृद्धी महामार्गावर बुलढाणा येथील अपघातात २६ जणांचा मृत्यू झाल्यामुळे ही घटना संवेदनशील असल्याने भाजपने मोर्चा रद्द केला. मात्र कोणतीही संवेदना न उरलेल्या व केवळ राजकारण करणाऱ्यांनी मोर्चा काढला, अशी टीका मुख्यमंत्र्यांनी केली. आजचा मोर्चा म्हणजे 'चोराच्या उलट्या बोंबा' आहेत. कोविड सेंटर लोकांना जगवण्यासाठी बनवली होती की मारण्यासाठी? हा प्रश्न निर्माण झाला आहे. बोगस कोविड सेंटर, बोगस डॉक्टर, बोगस ऑक्सिजन प्लांट उभारण्यात आले. सदोष ऑक्सिजन प्रकल्पामुळे रुग्णांना ब्लॅक फंगस हा आजार झाला. एव्हढेच नव्हे, तर मृतांच्या टाळूवरील लोणी खाणाऱ्यांनी कोविड काळातील मृत व्यक्तींचे मृतदेह नेण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या बॉडीबॅगसाठी सहाशे रुपयांऐवजी तब्बल साडेसहा हजार रुपये खर्च केले. आम्ही ठाण्यात तीच बॅग अवघ्या ३२५ रुपयांना घेतली. काहीजण ठाण्यातील व्यवहारांची चौकशी लावण्याची चर्चा करत आहेत. मात्र कोणताही गैरव्यवहार झालेला नसल्याने बिनधास्त चौकशी लावा, असे आव्हान मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना दिले. ठाण्यात कोविड कालावधीत आम्ही १२०० बेडचे रुग्णालय महापालिकेच्या निधीशिवाय उभारले, मोफत रेमडेसिवीर वाटले, असे मुख्यमंत्री म्हणाले.

# मुंबईसह परिसरात आणखी काही दिवस मुसळधार

## मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदूर्गला यलो, तर पुणे, रायगड आणि पालघरला ऑरेंज अलर्ट जारी

राज्यात मान्सून उशिराने दाखल झाला तरीदेखील जूनच्या शेवटच्या काही दिवसांमध्ये तुफान पाऊस झाला. त्यामुळे खोळंबलेल्या पेरण्यांची लगबग सुरू झाली असून आता हवामान खात्याने जुलै महिन्याच्या पावसाचाही अंदाज दिला आहे. अशात शनिवारी हवामान खात्याकडूम महत्त्वाच्या शहरांना 'यलो' आणि 'ऑरेंज' अलर्ट जारी करण्यात आला आहे.

राज्यात उशिराने दाखल झालेला मान्सून जून अखेरीस तुफान बरसला आहे. अशात आता जुलै महिन्याच्या पहिल्याच आठवड्यातील पावसाने जोरदार हजेरी लावली असून पुढच्या काही तासांसाठी हवामान खात्याकडून अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबईत आणखी काही दिवस जोरदार पाऊस असेल, तर मुंबईसह परिसरात मुसळधार पावासाची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.

हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार, मुंबई शहर आणि परिसरात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेला पाऊस पुढील ३ ते ४ दिवसांत मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी मुसळधार कोसळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच मुंबई शहर आणि उपनगरातदेखील मध्यम ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

हवामान खात्याच्या माहितीनुसार मुंबई, नाशिक, ठाणे, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि अकोला या जिल्ह्यांमध्ये पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे, तर पुणे, रायगड आणि पालघरला ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी गरज पडल्यासच घराबाहेर पडावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, जूनमध्ये देशभरात सरासरीपेक्षा १० टक्के कमी पाऊस पडला. राज्यात सरासरीच्या तुलनेत पाऊस कमीच झाला आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्कः-9594418181 / 8424989898